ORIGINAL ARTICLE ISSN:- 2231-5063
Golden Research Thoughts

सारांश :-

ऊस तोडणी कामगारांच्या उद्ध्वस्ततेचा प्रखर आलेख मांडणारा नव्या दमाचा किंवा साठोत्तरीला दलित कांदबरीकार म्हणून योगीराज वाघमारे यांना ओळखले जाते. खरं तर दलित कथाकर म्हणून ते सर्व परिचित आहे. परंतू दलित कादंबरीच्या विश्वातही त्यांनी मोलाची भर घातली आहे. 'सभापती'–1995, 'पडझड'–2005, व 'धुराळा'–2005, या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या आहेत. त्याच्या एकदंर सर्वच लेखनाला महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रखर धार आहे. स्वतः लेखकाने शिक्षणक्षेत्रात वेगवेगळी पदे उपभोगलेली आहे. म्हणजेच लेखक हाडामासांचा शिक्षक असल्याने शिवाय वेगवेगळ्याा ठिकाणी होणाऱ्या बदल्यांच्या रूपाने त्यांनी मराठवाड्याचा प्रादेशिक परिसर पिंजून काढला. या आत्मनिरीक्षणातून त्यांनी दलित म्हणून विविध दाहक अनुभव घेतले, पाहिले व काही अनुभवले हेच अनुभव त्यांच्या शब्दरूप लेखनीतून उतरले आहे. यातून ऊस तोडणी कामगार देखिल सुटला नाही. मराठवाड्यातल्या ऊसतोडणी कामगारांचे भेदक वास्तव लेखकाने 'धुराळा' या कादंबरीतून रेखाटले आहे.

ऊस तोडणी कामगारांच्या उद्ध्वस्ततेचा आलेख – धुराळा

बाळासाहेब शेळके

मराठी अध्ययन व संशोधन केंद्र , रा. ब. नारायणराव
बोरावके कॉलेज श्रीरामपूर.

प्रस्तावना :-

'धुराळा' या ऊसतोडणी कामगारांच्या जीवनावर आधारलेल्या कादंबरीचे कथानक आवघ्या तीन महिन्यांच्या कालावधीत घडलेले आहे. लेखकाने या कमी अवधीमध्ये ऊसतोडणी मजूर कामगारांचा आशय मोठ्याा कलात्मकतेने गुंफला आहे. ही कादंबरी मराठवाड्याातील बीड, उस्मानाबाद व बार्शी या दुष्काळग्रस्त भागातील ऊसतोडणी कामगारांच्या जीवनावर आहे. या कादंबरीचा नायक श्सुदामाश हा ग्रामीण भागातील ऊसतोडणी कामगार आहे. कादंबरीच्या या कथानकाची सुरूवातच नायकाच्या वर्तमान काळापासून केली आहे. एक मित्र दुसऱ्या मित्राला आपण पाहिलेल्या चित्रपटाची काहाणी सांगत आहे असा भास ही कादंबरी वाचताना होतो. वर्तमानकालिन घटनेतून नायकाचा जीवनपट उलगडत जातो. सुदामा हॉटेल शिवशंकरमध्ये वेटरचे काम करीत आसतो. कामाच्या मोबदल्यात मालक जे देईल तेवढयावरच तो समाधान मानतो. आपल्या दुःखाची कोण्या ग्राहकाने विचारपूस केली तर त्याच्या मनाला जरा बरे वाटते. हॉटेलमध्ये येणाऱ्या साहेबांना तो आपल्या मनातील दुःख सांगतो, आणि या शोककहाणीतून त्याचा जीवनपट उलगडत जातो.

कादंबरीचा नायक म्हणजे देवीच्या वाडीचा सुदामा वाडवडिलांनी कमवून ठेवलेल्या कोरडवाहू जमिनीवर तो कसेतरी जीवन जगत आसतो. त्यातच वारंवार पडणारे दुष्काळ यामुळे सुदामा आणि दोन तीनशे उंबरे असणारी देवाचीवाडी मेटाकुटीला येते. दारिद्रयाशी झगडताना त्यांच्या नाकीनऊ येतात. याच दयनीय परिस्थितीचा फॅक्टरीवाला त्रिंबकराव फायदा उठवितो आणि कारखाना व ऊस तोडणी कामाबद्दल माहिती सांगतो. साधा गाडीवान सुध्दा पंधरा दिवसात एका तोळयाची आंगठी कमवितो. त्रिंबकरावांच्या या उद्गाराने सुदामा आंगठीचे स्वप्न पाहतो. सोनं–नाणं वरगड पैसा, कमविण्याच्या आशेने म्हणजे भविष्यकाळाची उज्जल स्वप्न साकार करण्यासाठी देवाच्यावाडीतील माणसे, नायक सुदामा व पत्नी मालन हे सर्वजण पोटापाण्यापूरती शेती असून ऊसतोडणीचे काम करण्यासाठी कारखान्याकडे निघतात. फॅक्टरीचा भोंगा अवाढव्य कारखाना यत्रांचा कर्कश आवाज त्यात माणसांचा बैलगाड्यांचा मालमोटारींचा सायकल अन् फटफटयांचा चित्रविचित्र आवाज व सभोवतलचे दृश्य पाहून बाया गडीमाणसे अचंबित होतात. कुणालाच झोप लागत नाही. फक्टरीचा परिसर दुर्गंधीने व्यापलेला असतो. घरातील बाया माणसं बारकी पोरं रस्त्यावर व गटारीवर शौचाला बसलेली असतात.

सुदामा व त्याच्या सर्व सहकाऱ्यांना धानुऱ्यांच्या देशमुखाचा ऊस तोडणीसाठी मिळतो. ऊसाच्या पाचटाने मजूरांचे सर्व अंग कापले जाते. बायकांच्या हातावर मांडीवर व पायावर कापलेल्या भेगा दिसतात. रगतपिती फुटल्यागत त्यांची अंग होतात, पण उघड कोणीच बोलत नाही. कामाच्या रगाड्याात मुक्या जनावरांचे सुध्दा हाल होतात. एवढे काम करून सुध्दा त्रिंबकराव त्यांच्या हातावर तुंडपुजे पैसे टेकवितो. चार पैसे कमविण्यापेक्षा खाण्यापिण्यातच मजूरांचे पैसे संपूण जातात. सुदाम्याच्या एकुलत्या एक मुलीला अंग झाकण्यासाठी साधा कपडा देखील मिळत नाही. ऊसतोडणी मजूरांच्या बायकांचे दुःख तर पाहवत नाही. आंघोळीसाठी तर त्यांना उघड्याावर बसावे लागते. गोरंपान व हळदीसारखं अंग असलेल्या मालनने उघड्याावर अंघोळ केल्यामुळेच तिच्यावर क्रूर घातक प्रसंग ओढवतो. 'हयो कारखाना हाय हजार भानगडी होणार... माणूस का एका चालीचा हाय गुण उधाळणारच' एका बाजूला पत्नीवरील संकट तर दुसऱ्या बाजूला दारिद्रय यामुळे तो मेटाकुटीला येतो. चिच्याच्या हॉटेलची उधारीही त्याला सतावत असते. देणेकरी लाथबुक्या घालून ऊसतोडणी मजूरांकडून पैसे हिसकावून घेतात. त्यामुळे बाजारचा दिवस असूनही त्यांच्या चुली पेटत नाही. भविष्यासाठी त्यांनी रंगविलेली स्वप्ने हवेतच विरून जातात. पैसे कमविण्या ऐवजी सर्व जण कर्जबाजारी होतात. त्यातच प्रतिष्ठित व संपत्तीचा माज असलेला बोकड प्रवृत्तीचा सर्जेराव मालनला पाहून शीळ घालतो. ही शीळ मात्र सुदाम्याला शांत बसू देत नाही. तो पेटून उठतो आणि विजेच्या चपळाईने धावत जाऊन सर्जेरावावर कोयत्याने वार करून त्याला रक्ताच्या थारूळयात पाडतो आणि स्वतः घरदार पत्नी व मुलीला सोडून परागंदा होतो.

कादंबरीचा नायक सुदामा व त्याच्या कुटुंबाची होणारी ही दैनावस्था वाचकाला अस्वस्थ करून त्याला विचार प्रवृत्त करणारी आहे. ग्रामीण भागामध्ये प्रतिष्ठित वर्गाकडून होणारे हे शोषण कल्पनेच्या बाहेरचे आहे. या शोषणाला विविध पदर आहे. आर्थिक शोषणाने तर या ऊसतोडणी कामगारांचे कंबरडे मोडले आहे. याचे प्रतिष्ठितांना मात्र काहीच वाटत नाही. उलट अडाणी व निरक्षर ऊसतोडणी मजूरकामगारांच्या भोळया स्वभावाचा त्रिंबकरावांसारखी माणसे फायदा उठवून कामगारांचे रक्त शोषून घेऊन आपल्या हाताच्या बोटात चार–चार सोन्याच्या आंगठया घालतात, पण उपाशी व दारिद्रयात खितपत पडलेल्या रात्रदिवस ऊसतोडणीचे काम करणाऱ्या कामगारांचे त्यांना काहीच सोयीर सूतक वाटत नाही. मजूरांना फक्त भाकरीवर आपले जीवन जगावे लागते. या प्रतिष्ठितांना फक्त पैसा महत्त्वाचा वाटतो. कामगारांच्या संसाराची होळी त्यांचे दुःख वेदना, व्यथा त्यांना हास्यास्पद वाटतात. ऊसतोडणी मजूर कामगारांना केवळ प्रतिष्ठितांच्या आर्थिक शोषणलाच बळी पडावे लागते, असे नाही तर त्यांचे लैगिंक शोषण देखील अंतःकरनाचा ठाव घेणारे आहे. उदा. सुदाम्याची पत्नी मालनवर सर्जेराव सारख्या नराधमाने ओढावलेला प्रसंग होय. ऊसतोडणी कामगार परिस्थितीने नडलेला आहे. व्यापलेला आहे. खंगलेला आहे. पण लैगिंक वासनेने तो दुबळा झालेला नाही. मालन ही खानदानी पतीशी एकनिष्ठ राहणारी स्वाभिमानी गृहिणी आहे. तिच्या उदध्वस्ततेला जबाबदार त्याचे दारिद्रय नसून उच्चभूप्रतिष्ठितांची हिंस्त्रपशूवृत्ती येथे जबाबदार आहे. पैसा आणि संपत्तीच्या माजामुळे हे प्रतिष्ठित गरिबांच्या आया–बहिणी आपल्या उराखांदयाखाली घेण्यासाठी त्यांचा खुण करायलाही मागेपुढे पाहत नाही. याचे प्रत्ययंतर सर्जेरावाच्या वर्तुणकीतून येते.

1947 साली भारत देशाला स्वातंत्र मिळाले. त्यामुळे भारत देश सुजलाम सुफलाम झाला. या देशातील 70 टक्के समाज खेडयापाडयात राहतो. तसेच पुरोगामी महाराष्ट्रात वसंतदादा पाटलांनी सहकाराचे तत्त्व रूजवले. सहकाराच्या माध्यमातून खेडयापाडयात सहकारी सोसायटया बॅका पतसंस्था स्थापन झाल्या. महाराष्ट्रात कारखान्यांची संख्या जोमाने वाढली. हा महाराष्ट्राचा एका बाजूला झालेला कायापालट सफेद कपडे परिधान करणारे कार्यकर्ते मोठया अभिमानाने सांगतात, पण आपले जन्मदाते आईबाप लहान लहान छोटी कच्ची बच्ची घरदार सोडून ऊसतोडणीसाठी परमुलखात आलेल्या ऊसतोडणी कामगारांच्या व्यथा वेदनांचा कोणीच विचार करताना दिसत नाही. आज कारखान्यातून निर्माण होणारी सफेद साखर फक्त आपल्याला दिसते. पण त्या साखरेच्या निर्मितीसाठी ऊसतोडणी कामगारांना किती रक्त सांडावे लागले त्याची किंमत कुणालाच नाही. उच्च प्रतिष्ठितांनी तर त्यांचे शारीरीक, आर्थिक व लैगिंक शोषण करून त्यांना उद्ध्वस्त केले आहे. त्यांच्या या उद्ध्वस्ततेला न्याय देणारा या महाराष्ट्रात अजूनही जन्मलेला नाही. ऊस तोडणी कामगारांचे हे बेघर बेवारस वास्तव हे कालचे व आजचे आहे. हेच समकालिन वास्तव 'धुराळा' या कादंबरीने रेखाटले आहे.

'धुराळा' या कादंबरीचा नायक सुदामा त्याची पत्नी व देवाच्यावाडीतील अण्णा, वैजूतात्या, परटाचा महादू, खंडूतात्या, परलादतात्या, शेवंताआत्याची पोरं, शामा गुरव ही सगळी माणसं बीड उस्मानाबाद व बार्शी या विविध जिल्हयातून ऊसतोडणीसाठी फॅक्टरीला आलेली असतात. पण कमविण्यापेक्षा गमविण्यातच त्यांचे आयुष्य संपून जाते 'कुत्राच्या जिवनाला तरी रया असते, पण माणसाच्या जिवणला रया नसते.' हे कटू वास्तव या सर्वांनी भोगलेले आहे. म्हणजे हे त्यांचे उद्ध्वस्त जीवन आज जरी आपल्याला दिसत असले तरी या व्यक्तिचित्रणांच्या उद्ध्वस्ततेने मोठी व्यापकता धारण केली आहे. कारण महाराष्ट्रातील तमाम ऊसतोडणी कामगारांच्या व्यथा वेदनांचे व त्यांच्या भरकटलेल्या संसाराचे प्रतिनिधीत्व त्यांनी केले आहे. म्हणून मराठवाडयातील ऊसतोडणी कामगारांचे हे दुःख नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातील ऊसतोडणी कामगारांचे ते दुःख आहे. हे 'धुराळा' या कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने मोठया परिणामकारकतेने स्पष्ट केले आहे.

लेखकाने ऊसतोडणी कामगारांची पिळवणूक किंवा शोषण करणारी प्रमुख व्यक्तिचित्रणेही मोठया कलात्मकतेने चित्रित केली आहे. उदा. ऊसतोडणी कामगारांचे आर्थिक शोषण करणारा व त्यांचे रक्त पिऊन संपत्तीने गब्बरगड्ड होणारा त्रिंबकराव फॅक्टरीवाला आणि आपल्या शाररिक व वासनेच्या भूकेसाठी मालन सारख्या ऊसतोडणी काम करणाऱ्या स्त्रिचा बळी घेणारा सर्जेराव किंवा देशमुखाचा गवरू ही दोन्ही व्यक्तिचित्रणे आत्मघातकी व बेरकी प्रवृत्तीची आहे. या व्यक्तिचित्रणांच्या माध्यमातून लेखकाने ग्रामीण भागातील माणसांच्या प्रवृत्तींचे दर्शन चव्हाटयावर मांडले आहे.

'धुराळा' या कादंबरीतील वातावरणाने तर मराठवाडयाचा प्रादेशिक परिसर, कादंबरीचा आशय विषय घटना प्रसंग व व्यक्तिचित्रणे या सर्वांना जीवंत केले आहे. कादंबरीत येणारा हा परिसर स्वतंत्ररित्या बाजूला करता येत नाही. इतका तो आशयाशी एकरूप झालेला आहे. उदा. 'देवाचीवाडी तशी आडवळणाचीच... घरच अशी आहेत की इथ दोन चार तर तिथ चार पाच ना विटाची ना दगडाची. एकावर एक दगडगोटा ठेवावचा शेण मातीचा लेप घालायचा.... त्यावर उतरते छपर टाकले की झालं.... मारूती मंदिराच्या पलिकडून ग्रामपंचायत सोसायटीच हापीस हाय.... सोसायटीच्या मागं अन ओढयाच्या अलिकडं प्राथमिक शाळेच्या दोन खोल्यांची इमरत हाय. किंवा फॅक्टरीच्या परिसराचे वातावरण–फॅक्टरीचा भोंगा उंच उंच आकाशात गेलेला. कारखाना अवाढव्य पसरलेला यंत्राचा कर्णकर्कश आवाज... त्यात माणसांचा... बैलगाडयांचा... सायकल व फटफटयांचा आवाज... फॅक्टरीच्या भोवती मजूरांच्या चाळी... या खुज्या घरातील माणसं.... फॅक्टरीत काम करणारी विविध प्रकारची माणसं.... पेट्रोलपंप... खानावळी... चहाची हॉटेल... पिठाची गिरणी कटिंग सलूनची दुकाने' लेखकाने केलेल्या या प्रभावी वातावरणनिर्मितीने ऊसतोडणी कामगार त्यांचा परिसर त्यांची ग्रामीण बोलीभाषा. भोळी समजूत, माणसांचे दारिद्रय, वारंवार पडणारे दुष्काळ, ग्रामीणांचे होणारे स्थलांतर, त्यांच्या वाटयाला आलेली उपासमार व असाहयता कौटुंबिक ताणतणाव प्रतिष्ठित कार्य कर्त्याकडून ऊसतोडणी कामगारांचे होणारे आर्थिक व लैगिक शोषण, कारखान्याचा अवाढव्य व रोगराईला निमंत्रण देणारा गलिच्छ परिसर, इत्यादीचे बोलके चित्रण सर्व वैशिष्टया सह नेमकेपणाने चित्रिण केले आहे. या वातावरणनिर्मितीतून ऊसतोडणी कामगारांच्या जगण्या भोगण्याचा विस्तारीत आलेख आपल्या डोळापुढे साक्षात जीवंत उभा राहतो हेच खरे लेखकाचे मोठे यश म्हणावे लागते.

ऊसतोडणी कामगारांचे दैनंदिन जगणं, राहणं, बोलणं, वागणं व ग्रामीण भागातील प्रतिष्ठित व्यक्तिची नकली बुरख्यातील स्वार्थी व पापभेरू वर्तन इत्यादींचे दर्शन घडविण्यासाठी लेखकाने पात्रमुखी निवेदनासाठी प्रभावी ग्रामीण भाषाशैलीचा वापर कालि आहे. ही ग्रामीण बोलीभाषा कादबंरीच्या आशयला विषयाला व घटना प्रसंगांना अनुसरून वापरली आहे. कादबरीच्या तृतीय पुरूषी निवेदन पध्दतीमूळे ऊसतोडणी कामगारांचे भावविश्व जीवंत झाले आहे. उदा. प्रसंगवर्णने, स्थलवर्णने, पशुपक्ष्यांचीवर्णने निसर्गवर्णने, संवाद, स्वगत व भाष्य या सर्वांना लेखकाने मराठवाडयातील ग्रामीण बोलीभाषेने साक्षात जीवंत रूपात उभे केले आहे. हे लेखकाचे कौशल्य या ठिकाणी उल्लेखनीय आहे.

निष्कर्ष:

1. 'धुराळा' या कादंबरीने आशयाची व्यापकता स्पष्ट केली आहे. कारण ऊसतोडणी कामगारांचे हे दुःख व त्यांची होणारी ही ससेहोलपट केवळ मराठवाडयातील सुदाम्याची किंवा त्याच्या सहकारी सोबत्यांची नाहीत तर तमाम महाराष्ट्रातील ऊसतोडणी कामगारांचे हे करूण दुःख आहे आणि त्याचे प्रतिनिधीत्व कादंबरीचा नायक सुदामा याने केले आहे.
2. ऊसतोडणी कामगार दरिद्री आहे परिस्थितीने नडलेला व खंगलेला आहे, पण लाचार नाही. त्याच्यामध्ये स्वाभिमान व इज्जत आहे. म्हणून सुदामा आपल्या पत्नीवर हात टाकणाऱ्या सर्जेराव सारख्या नराधमाचे कोयत्याने हात छाटतो.
3. 'धुराळा' या ऊसतोडणी कामगारांच्या जीवनावर आधारलेल्या कादंबरीने प्रतिष्ठितांची बोकड पवृत्ती त्यांचा स्वार्थी व बेगडी स्वभाव चव्हाटयावर मांडला आहे.
4. ऊसतोडणी कामगारांचे हे दुःख कालचे नाहीत तर आजचे आहे. म्हणजेच 'धुराळा' या कादंबरीने आजचे समकालिन वास्तव भेदकतेने चित्रित केले आहे.
5. मराठवाडयाचा प्रादेशिक परिसर या कादंबरीने जीवंत उभा केला आहे.
6. ऊसतोडणी कामगारांच्या व्यथा वेदनांचा त्यांच्या दारिद्रयाचा त्यांच्या शोषणाचा व न संपणाऱ्या त्याच्या दुःखाचा आकोश या कादंबरीने प्रखरतेने मांडला आहे.

संदर्भ व टीपा

1. वाघमारे योगीराजः 'धुराळा' हर्ष प्रकाशन पद्मजापार्क जुळे सोलापूर.
2. गायकवाड डॉ. विनोदः योगीराज वाघमारे यांच्या एकसष्ठीनिमित्त आयोजित श्दलित साहित्य व मानवमुक्ती परिसंवादातील शोधनिबंध.
3. जाधव रा. ग.: 'निळी पहाट' श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.
4. मुलाटे डॉ. वासुदेवः 'दलित साहित्य नवे आकलन' मराठवाडा पब्लिशिंग हाऊस औरंगाबाद.
5. चंदनशिव डॉ. सुनीलः 'ग्रामीण दलित नवसाहित्य आकलन व आस्वाद' कोल्हापूर.